आशियाई विकास बँक अर्थसहाय्यित महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प संस्थेवर मा.मंत्री (पणन) यांची अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः मॅग्नेट ०८२५/प्र.क्र.८७ /२१-स**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: १० जून , २०२५.

**वाचा:-**

१) शासन निर्णय सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र.कृपमं०११८/प्र.क्र.१३/२१-स, दि.१९.१०.२०१८ व दि.२०.१०.२०१८.
२) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र.कृपमं-०११८/प्र.क्र.१३/२१-स, दि.३०.०९.२०२०.
३) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र.योजना-१०२०/प्र.क्र.१८३/२१-स, दि.०९.१०.२०२०.

**प्रस्तावना:-**

दि.२९.०७.२०२० रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णयानुसार आशियाई विकास बँक (ADB) अर्थसहाय्यित "महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) (Maharashtra Agribusiness Network-MAGNET)" प्रकल्प ६ वर्षासाठी राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये राबविण्यास संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

मॅग्नेट प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याकरिता संस्था नोंदणी अधिनियम १८६०(XXI of १८६०) अन्वये "महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क प्रकल्प (MAGNET) संस्था" संदर्भाधिन क्र.३ येथील शासन निर्णयान्वये स्थापन करण्यात आलेली असून, सदर संस्थेच्या रचनेनुसार अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, पणन विभाग, मंत्रालय, मुंबई हे अध्यक्ष आहेत.

मॅग्नेट संस्थेमध्ये लोकप्रतिनिधींचा सहभाग होऊन विविध लोकप्रतिनिधींच्या तसेच शेतकऱ्यांच्या विषयांची प्राधान्याने हाताळणी होऊन, परिणामकारक कामकाज होण्यासाठी दि.२७.०५.२०२५ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत "महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क प्रकल्प (MAGNET) संस्थेचे" अध्यक्ष हे मा.मंत्री (पणन) व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, पणन विभाग, मंत्रालय हे सह अध्यक्ष असतील असा बदल करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच, मॅग्नेट प्रकल्प राबविण्यासाठी व मॅग्नेट प्रकल्पाचे सनियंत्रण करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या सुकाणू समितीचे अध्यक्ष मुख्य सचिव यांच्याऐवजी "मुख्यमंत्री" हे अध्यक्ष व "मंत्री (पणन)" हे उपाध्यक्ष व "मुख्य सचिव" हे सदस्य असा बदल करण्यास मान्यता देण्यात आली.

उपरोक्त मंत्रिमंडळ निर्णयानुसार संदर्भ क्र.३ येथील दि.९ ऑक्टोबर २०२० च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या मॅग्नेट संस्थेच्या रचनेमध्ये मा.मंत्री(पणन) हे अध्यक्ष व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, पणन विभाग, मंत्रालय हे सह अध्यक्ष असतील असा बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन निर्णयः-**

मॅग्नेट प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याकरिता संदर्भ क्र.३ येथील दि.९ ऑक्टोबर २०२० च्या शासन निर्णयान्वये संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये स्थापन करण्यात आलेल्या "महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क प्रकल्प (MAGNET) संस्था" हीच्या रचनेमध्ये मा.मंत्री(पणन) हे अध्यक्ष व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, पणन विभाग, मंत्रालय हे सहअध्यक्ष असतील असा बदल करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. त्यानुसार "मॅग्नेट"संस्थेची रचना खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्र. | समिती सदस्यांचे पदनाम | समितीतील पदनाम |
|---|---|---|
| १. | मा.मंत्री (पणन) | अध्यक्ष |
| २. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, पणन विभाग, मंत्रालय मुंबई | सह अध्यक्ष |
| ३. | कार्यकारी संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ, मुंबई | सदस्य |
| ४. | पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य |
| ५. | कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे | सदस्य |
| ६. | सहसचिव/उपसचिव, पणन विभाग, मंत्रालय मुंबई. | सदस्य |
| ७. | सहसचिव/उपसचिव, कृषि विभाग, मंत्रालय मुंबई. | सदस्य |
| ८. | सहसचिव/उपसचिव, वित्त विभाग, मंत्रालय मुंबई. | सदस्य |
| ९. | सहसचिव/उपसचिव, नियोजन विभाग, मंत्रालय मुंबई. | सदस्य |
| १०. | प्रकल्प संचालक, मॅग्नेट प्रकल्प. | सदस्य सचिव |

२. सदर शासन निर्णय दि.२७.०५.२०२५ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २०२५०६१०१८५२०६१३०२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by PRAVIN CHINDHU DARADE
Date: 2025.06.10 18:53:04 +05'30'

**(प्रवीण दराडे)**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा/परिषद, विधान भवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास व गृहनिर्माण) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

५. मा.मंत्री (पणन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
८. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव(पणन/वित्त/नियोजन),मंत्रालय,मुंबई.
९. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे.
११. कार्यकारी संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ, मुंबई.
१२. प्रकल्प संचालक, महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प, पुणे.
१३. सह सचिव/उप सचिव, वित्त विभाग(व्यय-२/अर्थबळ),मंत्रालय,मुंबई-४०००३२.
१४. सह सचिव/उप सचिव, नियोजन विभाग(कार्या-१४३१), मंत्रालय, मुंबई-४०००३२.
१५. सहसचिव/उप सचिव,(कृषि),मंत्रालय, मुंबई-४०००३२.
१६. निवडनस्ती (२१-स).